महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका, नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर
दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : rdc.palghar-mh@gov.in

**वाचले :**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.

४) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडील पत्र क्र.करोना-२०२०८/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १२/०६/२०२०.

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/तालुका स्तरीय नियंत्रण कक्ष/आदेश/कावि-१३७०/२० दि.०१/०७/२०२०

## आदेश :-

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. सदर शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी, पालघर जिल्हयातील ग्रामीण भागातील रहिवाशी शहरामधुन परत आल्याने तसेच लॉकडाऊन शिथिल झाल्याने ग्रामीण भागातुन विविध कारणासाठी लोकांची शहरात ये-जा सुरु झाल्याने कोविड-१९ रुग्णांची संख्या ग्रामीण भागात वाढताना दिसत आहे. सदर करीता कोविड-१९ प्रतिबंध आणि नियंतत्रणाच्या अनुषंगाने तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करुन त्यामार्फत तालुक्यांतर्गत समन्वय तसेच पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांचे नियंत्रणाखाली तालुका निहाय खालील प्रमाणे कक्षाची स्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | कंट्रोल रुम मध्ये काम करणा-या कर्मचा-याचे नाव | पदनाम | कंट्रोल रुम चा Land Line Number | Mobile Number | कंट्रोल रुम चा Main Mail Id |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई | श्री.आदित्य राऊळ | कृषी अधिकारी | | ९०४९४९७३३९ | covid१९crvasai@gmail.com |
| | | श्री.सुदाम इंगळे | विस्तार अधिकारी(पंचायत) | | ९०११३८५१७४ | |
| | | श्री.संजय पाटील | आरोग्य सेवक | | ९९६७२७२२५२ | |
| २ | पालघर | श्री. विनोद भास्कर पाटील | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) तथा अतिरिक्त कार्यभार सहा. गट विकास अधिकारी, पं.स. पालघर | ०२५२५-२५०४४० | ८४११९५२११४/ ९८९००५२१६६ | covid१९crpalghar@gmail.com |
| | | श्री. नारायण देवराम जैवळ | आरोग्य सहाय्यक | ०२५२५-२५०४४० | ९७६३२६३९७३ | |
| | | श्री. प्रतिक अरुण संखे | कनिष्ठ सहाय्यक | ०२५२५-२५०४४० | ७४७०००८५५५ | |
| | | श्रीम. अर्चना घोडके | कंत्राटी संगणक परिचालक | ०२५२५-२५०४४० | ७०२०७७०६४७ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | डहाणू | श्री.बी.एच.राठोड. | सहाय्यक गट विकास अधिकारी | ०२५२५-२२२३८७ | ७४९८८७००७९ | covid१९crdahanu@gmail.com |
| | | श्री.डी.अे.पाटील. | सहाय्यक प्रशासन अधिकारी | | ८६९८७१३०२७ | |
| | | श्री.एम.डी.माळी. | आरोग्य सहाय्यक | | १०२८६३१५१७ | |
| | | श्री.जी.एम.कुलकर्णी | आरोग्य पर्यवेक्षक | | ९४०४२३४५२६ | |
| | | श्री.आर.एस.अभंगराव. | शाखा अभियंता - पाणीपुरवठा | | ९८६०९७००१५ | |
| | | श्री.वाय.जे.राजपूत. | कनिष्ठ सहाय्यक | | ८७८८५४९९६१ | |
| | | श्री.पि.जे.पाटील. | शिपाई | | ९५१८३५१३५३ | |
| | | श्री.बी.व्ही.हमरे. | शिपाई | | ८७८८६७६२४६ | |
| ४ | तलासरी | श्री. बापुराव व्यंकट नाळे | विस्तार अधिकारी (पंचायत) | | ९५५२९४३०२२ | covid१९crtalasari@gmail.com |
| | | श्री. दानबहादूर जमुनादास यादव | आरोग्य पर्यवेक्षक | | ९२२६२७७४५१ | |
| | | श्री. विजय वनशा वरठा | वरीष्ठ सहायक तथा प्र.सहा प्रशा.अधिकारी | | ९५५२७०५५३९ | |
| | | श्री. कल्पेश रामा महाले | डाटा ऑपरेटर | | ९६३७६७३३३४ | |
| ५ | वाडा | श्री. एल. एन. थाळेकर | विस्तार अधिकारी (ग्रा.प.) | ०२५२६-२७१४१७ | ९७३०००८३२६ | covid१९crwada@gmail.com |
| | | श्रीम. मोनिका राऊत | क. प्र. अ. | | ९६८९६९००७८ | |
| | | श्री. एल. एन. थाळेकर | ता. व्य.(आ.स.से.के.) | | ९२७०७१४१६१ | |
| ६ | विक्रमगड | हरेश गवळी | कनिष्ठ सहायक | ०२५२०-२४०५९४ | ८८०६०४१३६८ | covid१९crvikramgad@gmail.com |
| | | अजय पाटील | कनिष्ठ सहायक | ०२५२०-२४०५९५ | ९५४५९५४५०४ | |
| | | यतीन घरत | गट समन्वयक | ०२५२०-२४०५९६ | ९२२५८९०००६ | |
| | | तुषार पाटील | डेटा ऑपरेटर | ०२५२०-२४०५९७ | ९२२६९३२९९५ | |
| ७ | जव्हार | श्री. डॉ. पंकज वडिले | वैदकीय अधिकारी, नादगाव | ९७६६९४३२७५ | ९५५२९५७४४४ | covid१९crjawhar@gmail.com |
| | | श्री प्रवीण पाटील | आरोग्य सेवक | | ९८९०६३६८९५ | |
| | | श्री दत्तात्रेय नजन | आरोग्य सेवक | | ९६०४२०२३४९ | |
| | | श्री वसंत शंकर खुताडे | आरोग्य सहायक | | ९२७३८८५३१० | |
| | | श्री संदीप संभाजी देसाई | शिक्षक | | ७७५८००६११० | |
| | | श्री सुरेन्द्र केशव गावीत | शिक्षक | | ९७६६२९९७१४ | |
| | | श्री ज्ञानेश्वर सदाशिव नागरे | शिक्षक | | ९४२११३३७२० | |
| | | श्री गवरचंद उत्तम शिवदे | शिक्षक | | ९८२३६६४९४६ | |
| | | श्री राजेश वाशिबे | शिक्षक | | ८०८७२२८४५० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | मोखाडा | श्री. रघुनाथ कमा गरेल | सहाय्यक प्रशासन अधिकारी | ०२५२९ २५६६७३ | ९२२२३१५४४६ | covid१९crmokhada@gmail.com |
| | | श्री. केशव भगवान कापडे | कनिष्ट सहाय्यक | | ९४२०८३१५२६ | |
| | | श्री. अजित भिवा गवळी | तालुका व्यवस्थापक (ASSK) | | ९२२६३३६७४३ | |

**<u>तालुका स्तरावरील नियंत्रण कक्षाच्या जबाबदा-या खालील प्रमाणे राहतील.</u>**

१ .उपोदघातातील अनु.क्र.4 अन्वये ग्रामीण कार्यक्षेत्रासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर कोविड 19 संदर्भातील तयारी, बाहय रुग्ण् तपासणी, पायाभुत सुविधा, अतिजोखमेच्या व्यक्तीचे विशेष सर्वेक्षण, आजारी व्यक्तींना वेळीच औषधोपचार, संदर्भ सेवा नियोजन, आरोग्य शिक्षण व लोकसहभाग, रुग्णकल्याण समिती बैठक, प्रशिक्षण व क्षमता संवर्धन, आंतरविभागीय समन्वय, व अबाधित नियमित आरोग्य सेवा याची काटेकोर अंमलबजावणी करणे ही जबाबदारी गटविकास अधिकारी यानी नियंत्रण कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहाय्याने पार पाडणे.

२. सर्व शिघ्र प्रतिसाद पथक यांचेशी समन्वय राखुन कोविड-१९ बाधित व्यक्ती, त्यांचे जोखमीचे सहवाशित यांना रुग्णवाहिका/ वाहन उपलब्ध होऊन ते नजिकच्या संस्थेत त्वरित त्याच दिवशी पोहचल्याची खातरजमा करणे. याकरीता सर्व उपलब्ध रुग्णवाहिका, संबंधित संस्थेचे जबाबदार अधिकारी, जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांना संपर्क करुन समन्वय साधणे. प्रा.आ. केद्र अंतर्गत तसेच तालुक्यातील रुग्णाची सद्यस्थिती बाबत माहिती ठेवणे तसेच CCC/Quarantine सुविधाआवश्यकतेनुसार निश्चित करणे.

३. सर्व प्रा.आ. केंद्र वैद्यकिय अधिकारी यांच्याशी समन्वय ठेऊन बाह्यरुग्ण कक्षातुन तसेच प्रतिबंधित क्षेत्रातुन कोविड-१९ तपासणी करीता संदर्भित व्यक्ती/ रुग्ण यांना वाहतुकीची व्यवस्था करुन संदर्भित करावयाच्या संस्थेचे जबाबदार अधिकारी, जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांना संपर्क करुन समन्वय साधणे व त्यांना वेळेत उपचार मिळतील याची खातरजमा करणे. रुग्णवाहिकेची उपलब्धता व अतिरिक्त आवश्यकता लक्षात घेवुन नियोजन करणे. **तालुक्यातील कोणत्या प्रा.आ. केंद्रतील संशयित रुग्ण कोणत्या केंद्राकडे संदर्भित करावयाचे यांचे नियोजन व रुग्ण वाहिकाची सोय करणे.**

४. तालुकांतर्गत जोखमिचे सहवासित, SARI/ ILI रुग्ण तसेच प्रतिबंधित क्षेत्रातील सर्वेक्षणात आढळुन आलेले रुग्ण व गरोदर माता तसेच इतर व्यक्ती यांची दैनंदिन घेतलेल्या नमुन्यांची संस्थानिहाय संख्या तसेच त्यांचे अहवाल जिल्हास्तरावरुन/ संस्थास्तरावरुन प्राप्त करुन आलेल्या निकालाबाबत (Positive/Negative/ Inconclusive/Inadequate/Rejected) नोंदी ठेवणे व दैनंदिन अहवाल सादर करणे. तसेच प्रयोगशाळा निहाय अप्राप्त अहवालाबाबत माहिती घेणे.

५. ज्या रुग्णांचे घश्याचे नमुने पॉझिटिव्ह आढळून येतात. त्यांना ते व्यक्तीश: दूरध्वनी करुन कळविणे व त्यांना वैद्यकीय अधीक्षक च्या सल्ल्याने CCC/DCHC/DCH facility मध्ये संदर्भीत करणे.

६. तालुक्याअंतर्गत CCC/DCHC/DCH या संस्थेमध्ये दाखल रंग्णांची व एकूण उपलबध खाटांची माहिती अद्ययावत ठेवणे

७. प्रतिबंधित क्षेत्रातील सर्वेक्षणाबाबत दैनंदिन माहिती घेणे तसेच सदर क्षेत्रातील जोखिमग्रस्त व्यक्ती (मधुमेह/ दमा व इतर जुने श्वसनविकार/ उच्च रक्तदाब व ह्रदयविकार/ किडणीचे आजार व डायलिसिस वर असणारे रुग्ण/ कर्करोग/ नियमित ये-जा करणा-या व्यक्ती) यांची यादी प्राप्त करुन जिल्हास्तरावर सादर करणे.

८. रुग्ण शोधणे, रुग्णाचा पाठपुरावा करणे, निकट सहवाशिताचा शोध, संदर्भ सेवा, अलगिकरण सुविधा तसेच आरोग्य शिक्षण व जनतेचे प्रबोधन याकरिता शिक्षक, अंगणवाडी कार्यकरती ग्रामसेवक तलाठी यांचे सहकार्य घेणे.

९.. प्राप्त अहवाल तसेच जिल्हास्तरावरुन दैनंदिन स्वरुपात कळविण्यात आलेल्या सर्व कोविड-१९ बाधित रुग्णांचे अति जोखमिचे व कमी जोखमिचे सहवासित यांची यादी त्याच दिवशी रुग्णनिहाय तयार होईल व सर्व अति जोखमिचे सहवासित त्वरीत त्याचदिवशी संस्थात्मक अलगीकरणाचे ठिकाणी पोहचतील याची खातरजमा

करुन तसा अहवाल रुग्ण निहाय ठेवणे व त्यांच्या नोंदी Google Sheet मध्ये घेणे. सर्व शिघ्र प्रतिसाद पथक सक्षमतेने कार्यरत असुन सहवाशितांचा शोध सक्रियतेने होत असल्याची (एका रुग्णामागे सरासरी १७ सहवाशित अपेक्षित) खात्री करणे.

10. तालुकास्तरावर Helpdesk स्थापन करुन त्याला व्यापक प्रसिद्धी देणे व त्यामार्फत तालुक्यातील नागरीकांना तपासणीसाठी तसेच उपचारासाठी मार्गदर्शन करणे व त्यांना अपेक्षित सुविधा उपलब्ध करुन देणे.

11. आरोग्यसेतु द्वारे प्राप्त यादीतील व्यक्तींचा तपासणीसाठी पाठपुरावा करणे व तसा अहवाल सादर करणे.

नियंत्रण कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाच्या वेळेचे नियोजन करणे, त्यांना CCC/DCHC/DCH यांची माहिती तसेच समन्वयासाठी आवश्यक नोडल अधिकारी यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करुन देणे, त्याचे प्रशिक्षण घेणे तसेच वरील नुसार सर्व कार्यवाही त्यांच्यामार्फत दैनंदिन स्वरुपात विनाविलंब होत असल्याची खातरजमा करणे याची जबाबदारी संबधित गटविकास अधिकारी याची राहील. कोविड-१९ संबंधित तपासणी व उपचार सुविधा नागरीकांना त्वरीत उपलब्ध होईल तसेच याबाबत अपेक्षित अहवाल व नोंदी दैनंदिन घेतल्या जातील याची दक्षता घेण्यात यावी.

सदरचा आदेश हे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(b), भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ व साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरहू आदेश आज दिनांक ०१/०७/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत :**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
३) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.
४) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/ जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) गट विकास अधिकारी पं.स. वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/ वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत पालघर/डहाणू/जव्हार/तलासरी/मोखाडा/विक्रमगड/ वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती व प्रसिध्दीकरीता.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**